REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 3 | DECEMBER – 2017

# मराठी कवितेच्या प्रेरणादायी गतिमान पाऊलखुणा : एक चिंतन


प्रा. डॉ. संजय लांडगे
मराठी विभाग प्रमुख , ए.आर. बुर्ला महिला महाविद्यालय, सोलापूर.

## पस्तावना :

अभिमान याचा वाटतो की, मराठी कवितेला आठशे वर्षांची परंपरा आहे. सुरूवातीच्या काळातील धार्मिक, अध्यात्मिक प्रेरणेतून निर्माण झालेले संतांचे विपुल काव्य, पंडित कवीचे रंजक, बोधपर आख्यान काव्य आणि स्फुटकाव्य, तसेच इहवादी प्रेरणेतून स्फुरलेले मुख्यत: शाहिरी काव्य ही प्राचीन मराठी कविता आहे. संतकवींनी पारमार्थिक व सामाजिक आशय त्यांच्या काव्यात मांडला. पंडित कवींनीही रंजनपरता ठेवीत पारमार्थिक बोध हेच काव्याचे प्रयोजन मानून दीर्घ व स्फुट अशी रचना केली. शाहिरांनी काही प्रमाणात इहवादी प्रेरणांचा आपल्या काव्यात आविष्कार केला. अर्थात त्यांनी पारंपारिक भारतीय अध्यात्मही आपल्या कवितेतून वगळले नव्हते. मात्र त्यांच्या काव्यनिर्मितीमागे संतांसारखी आध्यात्मिक प्रेरणा नव्हती. इ.स. १८१८ पासून इंग्रजी राजवटीत मराठी समाजजीवनात खऱ्या अर्थाने आधुनिकीकरणाची सुरूवात झाल्यानंतर अर्वाचीन कवींनी प्रामुख्याने पाश्चात्य स्वच्छंदवादाला भारतीय रंगरूप देत नव्या युगाच्या प्रेरणा आपल्या कवितेतून साकारल्या. यानंतरच्या मराठी कवितेला आधुनिक हे विशेष प्रामुख्याने कालसापेक्षत्वाने वापरले जात असले, तरी त्या कवितेमध्ये आधुनिकतेचे प्रवृत्ती रूप गुणधर्म निश्चितपणे आहेत. केशवसुतप्रणित क्रांतीनंतर सुमारे साठ वर्षांनंतर दुसरी क्रांती मर्ढेकरांनी केली. मर्ढेकरांच्या कवितेत आधुनिकतेचा एक नवा टप्पा दिसतो.

१८८५ ते १९२० या कालखंडात केशवसुतांची कविता अतिशय प्रभावीपणे रसिकांसमोर आली. या कवितेचे पडसाद मराठी कवितेला नवीन नव्हते. हिच्या पाऊलखुणा कवितेत आढळतात. भक्ती हे संतकवींचे अधिष्ठान होते. लौकिक विषयासंबंधीच्या कवींच्या भावना कवितेत शब्दबध्द करण्याची प्रयोगशीलता हेच अर्वाचीन कवितेचे वेगळेपण मानल्यास वावगे ठरणार नाही.

१९२० च्या आसपास गोविंदाग्रज, ना.वा. टिळक, बालकवी यांच्यासारख्या कवींच्या निधनानंतर मराठी कवितेचा बहर ओसरू लागताच पुणे येथे 'रविकिरण' मंडळाची स्थापना झाली. माधव ज्युलियन, गिरीश, यशवंत, श्री.बा. रानडे, दिवाकर ही यामध्ये प्रामुख्याने कार्य करीत होती. संघटितपणे काव्यरचना करण्याचा हा एकमेव प्रयोग मानला गेला. 'रविकिरण' मंडळातील कवींनी नव्या व जुन्या अशा विविध जातींचा व चालींचा अवलंब करून गेय भावगीते रचली. ही भावगीते लोकप्रिय ठरली. मराठी कवितेला एकप्रकारची नवीन चालना दिली. काव्यगायनाची प्रथा सुरू करून कविता सर्वदूर सर्व समाजात ऐकवली. रविकिरण मंडळाचा आदर्श समोर ठेवून मराठी कवितेत लेखनप्रवाह कार्यरत होता. या काळात



गिरीश, यशवंत यांच्या कवितेतील नवलाई संपुष्टात येत होती. येथे मराठी कविता पुन्हा संपुष्टात आल्याचे जाणवत होते. परंतु कवी अनिल, कुसुमाग्रज, बा.भ. बोरकर यांच्या रूपाने तिला नवे धुमारे फुटले. सलगपणे घडलेल्या दोन्ही महायुध्दांनी आलेली मरगळ आणि कोंडी फोडण्याचे काम अनिल, कुसुमाग्रज, बोरकर यांनी केला.

आधुनिक कवितेला भरभराटीचे दिवस येण्यासाठी १९४०–४५ हा कालखंड उजाडावा लागला. या काळात नव्या उमेदीने काव्यलेखन करणाऱ्या

कवींच्या अनेक पिढ्या एकामागून एक अवतरत होत्या. कविता लिहित होत्या. मराठी कवितेची वाटचाल जगातील सर्व कवितेचा, भाषांचा विचार करता मानवी मनाची आद्य प्रवृत्ती काव्यात्मक अभिव्यक्तीकडे कललेली दिसते. मराठी मनही याला अपवाद नाही. इ.स. पूर्वीच्या गाथांचा संग्रह असलेल्या गाथासप्तशतीमध्ये मराठी स्त्रियांच्या जात्यावरील गाणी म्हणून गायल्या जाणाऱ्या गाथा आढळतात. याचा स्पष्ट अर्थ असा होतो की, मराठी भाषेच्या जडणघडणीच्याही अगोदर केवळ बोली स्वरूपात असलेल्या भाषेतही काव्यरचना झालेली दिसून येते. मराठी लोकगीते याची साक्ष होय. मानवी मनाच्या विकासाबरोबर समाजाचा विकास होत असतो. विकसनशील समाजात अभिव्यक्तीच्या वेगवेगळ्या तऱ्हा निर्माण होतात व त्यातून भाषेला वाङमयाचे स्वरूपही बदलत राहिलेले दिसते. गाथा किंवा लोकगीतांच्या स्वरूपातील आद्य मराठी कविता समाजाबरोबरच विकसित झाली आहे. अशी या मराठी कवितेत काळाच्या पार्श्वभूमीवर लोकगीते, प्राचीन मराठी कविता, आधुनिक मराठी कविता आणि नवकविता अशा प्रवृत्ती दिसून येतात.

## प्राचीन काव्याची सुरूवात

प्राचीन मराठी वाङमय हे प्राय काव्यरूपाने प्रकटली आहे. त्याची अनेक वैशिष्ट्ये दर्शविता येत असली तरी त्यातील एक प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे संतकवयित्रीचा त्यात असलेला लक्षणीय सहभाग होय. प्राचीन मराठी कवितेच्या विकासाला व विस्ताराला या कवयित्रींचा हातभार लागलेला दिसतो. महदंबा, जनाबाई, मुक्ताबाई व बहिणाबाई आदी मराठी कवयित्रींची एक वैभवशाली परंपराच अस्तित्वात येऊन ती एकूण मराठी काव्यप्रवाहाशी समांतरपणे वाटचाल करीत आहे.

प्राचीन मराठी कवयित्रींची कविता खरोखरच समकालीन प्रमुख काव्यप्रवाहातून वेगळी आहे काय? तिला स्वत:चे वेगळे अनुभवविश्व प्रकट करता आले आहे काय ? या अनुभवविश्वाच्या अभिव्यक्ती पध्दतीत काही विशेषता जाणवते काय ? या कवयित्रींची कविता प्रमुख काव्यपरंपरेचे केवळ प्रतिध्वनीरूप तर नव्हे? असे अनेक प्रश्न या संदर्भात उपस्थित होतात.

प्राचीन मराठी कवयित्रींची कविता समकालीन प्रतिभासंपन्न व प्रभावी व्यक्तिमत्व लाभलेल्या संतमनांनी जोपासली आहे. चक्रधरांनी श्री कृष्णभक्तीला महानुभावपंथात अधिष्ठान मिळवून दिल्याने श्रीकृष्णचरित्र हा जसा अनेकांच्या चिंतनाचा विषय झाला तसेच तो महदंबेच्या धवळ्यांच्या निर्मितीमागची खरी प्रेरणा होय. या प्रेरणेनुसार महदंबेच्या कवितेची वाटचाल झालेली दिसते.

वारकरी संप्रदायात अभंगरचना करणाऱ्या मुक्ताबाईंच्या अभंगवाणीवर ज्ञानेश्वरांच्या अभंगवाणीचा प्रभाव अपरिहार्यच आहे, कारण ज्ञानेश्वर हे केवळ एक संतकवीच नव्हे तर तिचे वडील बंधूही असल्याने ज्ञानेश्वरांच्या अखंड सहवासात राहणारी मुक्ताबाई ज्ञानेश्वरांप्रमाणेच तत्वचिंतनपर अभंगरचना करू लागते आणि अखेर आपल्या व्यक्तीमत्वाची व कवितेची पृथगात्मता सिध्द करते.

जनाबाई प्रपंचहीन असूनही नामदेवाच्या कौटुंबिक जीवनात रमते, नामदेवाचे कुटुंब हेच आपले विश्व आहे असे मानते. त्यामुळे नामदेवाच्या सहवासाने जनाबाईच्या अभंगातील अनुभूतीच्या कक्षा रूंदावल्या आहेत. तसेच नामदेवाची भक्तीपरता हेच जनाबाईच्याही अभंगविश्वाचे प्राणतत्व झाले आहे. संत चोखोबा, कर्ममेळा, गोरा कुंभार, सावता माळी, नरहरी सोनार, सेना न्हावी, कान्होपात्रा अशा कितीतरी थोर संतांनी आपल्या अभंगरचना समाजकल्याणासाठी, भक्तीसाठी रचल्या.

बहिणाबाई ही तुकोबांच्या झालेल्या अनुग्रह आपल्या आत्मनिवेदनपर अभंगात नोंदविते, बहिणाबाईला तुकारामांच्या प्रत्यक्ष सहवासात वावरण्याचे भाग्य लाभले आहे. तथापि तिच्या व्यक्तीत्वाची जडणघडण तुकोबांप्रमाणे अन्य पूर्वकालीन संतकवींच्या कवितेनेही केलेले दिसते.

बहिणाबाईंच्याच काळात लक्षात घेण्याजोगी काव्यनिर्मिती करणारी दुसरी कवयित्री म्हणजे वेणाबाई ही होय. रामदासी संप्रदायाचा तिने आश्रम घेतलेला असल्याने रामदास हे वेणाबाईंचे सांप्रदायिक गुरू 'श्री कृष्णचरित्र' हा जसा महदंबेच्या अखंड चिंतनाचा विषय झाला होता तसाच 'रामचरित्र' हा वेणाबाईच्या अखंड चिंतनाचा विषय होता. 'रामदास' हे वेणाबाईचे सांप्रदायिक गुरू तर एकनाथ हेच तिचे काव्यविश्वातील गुरू होते. एकनाथांच्या भावार्थ रामायणाने तिला रामचरित्राचा पूर्वीच परिचय करून दिलेला होता. कथानिवेदन हीच तिच्याही कवितेमागे खरीखुरी प्रेरणा होय.

प्राचीन मराठी काळात ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम व रामदास आदी कवींनी जे जे काव्यबंध हाताळले ते आत्मसात करून क्वचित स्वयंप्रेरणेने एखादी नवी पाऊलवाट चोखाळून मराठी कवयित्रींनी काव्यनिर्मिती केली आणि अप्रत्यक्ष आपल्या स्त्रीसुलभ भाववृत्तीचा आविष्कार करून या काव्यबंधांना जोपासण्याचा प्रयत्न केला.

शिवकालाच्या प्रारंभासरशी पोवाड्यांच्या स्वरूपात प्रारंभीच झालेली शाहिरी कविता अठराव्या शतकाच्या पूर्वार्धात चौफेर विस्तारलेली दिसते. अठराव्या शतकात टाळ–मृदुंगाची जागा ढाल–तलवारींनी घेतली. देवदेवतांच्या कथागायनापेक्षा पराक्रमी वीरांच्या चरित्रगायनाची निकड भासू लागली. एक नवचैतन्य, नवी उर्मी शाहिरांच्या मनातून उसळली व तिने विभूतीपूजनाच्या प्रेरणेने वीरपुरूषाचे स्तोत्रगायन केले. त्यामुळे शाहीर या शब्दाचा अर्थ पुरूषार्थाशी, पराक्रमाशी असून त्यागाशी निगडीत झालेला दिसतो. शाहीर म्हणजे पोवाडेकार असे एक समीकरण या काळातील राजकारणप्रेरित काव्यात आलेले दिसते.

## मध्ययुगीन काळ

विभूतीपूजन एवढीच शाहिरी काव्यामागे लोकरंजनाचीही एक प्रबळ प्रेरणा होती. शाहिरी काव्यातील ही लोकरंजनाची प्रेरणा पूर्णत: साम्राज्य जनांच्या कामभावनेशी निगडित होती. लावणी ही तमाशाचे एक साधन म्हणून जन्मली होती, जगली होती व विकसित झालेली होती. तमाशा होता म्हणून शाहीर होते आणि शाहीर होते म्हणून तमाशा होता. शाहीर हे तमाशाचा लेखकवर्ग होता. तमाशा हा बहुजन समाजाच्या मनोरंजनाचे एक प्रमुख साधन होते. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकाराम, संत एकनाथ, संत रामदास अशा कितीतरी कवींच्या रचनांनी लोकजागृती केली.

तुकारामोत्तर कालात वामनपंडित, सामराज, रघुनाथपंडित, मोरोपंत असे दर्जेदार काव्यनिर्मिती करणारे पंडित कवी दर्शविता आले. तरी एखादी कवयित्री मात्र दर्शविता येत नाही. ह्याचा अर्थ असा की, प्राचीन मराठी कवयित्रीच्या प्रतिभा प्रकृतीस पंडिती काव्यापेक्षाही संतकाव्यच अधिक जवळचे.

पारंपारिक महाराष्ट्रीय स्त्रीजीवनाचा आधुनिकतेच्या पातळीवर पहिले काव्यात्म अविष्कार साधणारी आधुनिक मराठी कवयित्री म्हणून सावित्रीबाई फुले यांच्याकडे पाहिले जाते. त्यांनी इ.स. १८५४ मध्ये 'काव्यफुले' हा कवितासंग्रह प्रकाशित झाला. ह्या संग्रहामध्ये ४१ स्फुटरचना समाविष्ट आहेत. १८५४ मध्ये हा संग्रह शिळाप्रेसवर छापून प्रसिध्द झाला. त्यामध्ये शिक्षण, जातीभेद, शुद्रशब्दार्थ, सुंदर फुले, बळीस्तोत्र, बालकांना समुपदेश, इंग्रजी माऊली आली अशा विविध विषयांवरील कवितांचा समावेश आहे.

## आधुनिक काळ

तसेच आधुनिक मराठीतील पहिली कवयित्री म्हणून सावित्रीबाई फुले यांना ओळखले जाते. प्रामुख्याने आधुनिक कवयित्रीच्या कवितेच्या विचाराची सुरूवात सावित्रीबाई फुले यांच्या कवितेपासून होते असे मानले जाते. इ.स. १८९० च्या सुमारास लक्ष्मीबाई टिळक यांना अक्षर ओळख झाली. इ.स. १८९४ मध्ये त्यांची पहिली कविता जन्मास आली. १९०७ मध्ये त्यांची पहिली कविता प्रकाशित झाली आणि त्यांची समग्र कविता इ.स. १९५१ मध्ये 'भरली घागर' च्या रूपात प्रसिध्द झाली.

१९५० ते १९८० या कालखंडातील इतर ललित व आत्मचरित्रपर साहित्यात स्त्रीलेखिकांनी जे जीवनदर्शन घडविले ते खूपच नवे, निर्भय व अर्थपूर्ण होते. त्याच्या तुलनेत स्त्रीकाव्य व कवयित्री ही दोन्हीही एक मर्यादित संवेध विश्वात वाटचाल करताना दिसतात. गद्य साहित्यातून स्त्रीजीवनाचे जे सूक्ष्म, व्यापक व वास्तव दर्शन घडत होते, तसे दर्शन कवयित्रीच्या काव्यातून घडले नाही. हे खरेच आहे, पण या कवयित्रीनी आपल्या स्थायीभावाशी प्रतारणा करून कृतकपणे व्यापक वास्तवाचा वेध घेणे हे स्पृहणीय ठरले नसते, हेही लक्षात घेतले पाहिजे. इंदिरा संत, संजीवनी मराठे, शांता शेळके, कुसुमाग्रज, पु.शि. रेगे, वि.दा. करंदीकर, मंगेश पाडगावकर, वसंत बापट, पद्मा गोळे, अनुराधा पोतदार, शिरीष पै असे कितीतरी कवी आपापल्या वाटेने वाटचाल करीत राहिले, हे उचितच मानले पाहिजे. साठोत्तरी कालखंडात भावकवितेला नव–नवी परिमाणे प्राप्त करून देणारी नवी पिढी अत्यंत जोमाने पुढे आली.

देशीयतेची परंपराही आधुनिक मराठी स्त्रीकाव्याचे एक स्वयच्छेदक लक्षण आहे आणि तेही ऐंशीनंतरच्या कवयित्रींनी जाणून घेतले आहे. मात्र जीवनमूल्यांची, स्त्रीची व स्त्रीत्वाची, प्रापंचिक भूमिकेची, व्यक्तिगत मूल्यमापनाची जुनी संदर्भ चौकट १९८० नंतरच्या कवयित्रींनी मोडून टाकली आहे. तसे पाहिले तर, पूर्वकालीन स्त्रीकाव्याचा सरळसरळ ठसा १९८०

नंतरच्या कवयित्रींवर आहे असे दिसत नाही. या कवयित्री अधिक मागे वळून प्राचीन संतकवयित्रीशी काही एक अनुबंध गुंफत आहेत असे दिसते. त्याचप्रमाणे लोकसाहित्य, लोकगीते, परंपरागत स्त्रीगीते व गाणी यांच्याशीही या कवयित्री भावबंधन जोडताना दिसतात. १९८० पूर्वीची स्त्रीकविता प्राधान्याने कवयित्रींच्या व्यक्तिमत्वाशी इमान राखणारी होती आणि १९८० नंतरची कविता स्वत:शी व आपल्या काळाशी संवाद व संगती राखणारी आहे. ती वास्तवाशी नाते सांगते. अनुभवसंपन्न आणि जीवनाशी भिडणारी ती बोलकी कविता आहे.

## समारोप

कविता म्हणून जे साहित्य आपणापुढे आले ते विविध प्रकारचे आहे. जुन्या अभंग ओवीपासून नव्या मुक्तछंदापर्यंत सर्व वृत्तछंदात मोठी शब्दसंचय झालेला आढळतो. १९८० पूर्व काव्याने भावकवितेचा एक समृध्द दालन काव्यरूपाने उभे केले आहे. स्मृतीजीवन प्रत्यक्ष अनुभूतीचा क्षण आणि वास्तवातून त्यांचे केलेले सूक्ष्म–व्यामिश्र प्रतिमांकन हा या कवितेचा वारसा १९८० नंतरच्या कवींनी स्वीकारला आहे. त्यातूनच नवी कविता जन्माला आली.

## निष्कर्ष

१) मराठी कवितेला आठशे वर्षांची परंपरा आहे. सुरूवातीच्या काळातील धार्मिक, अध्यात्मिक प्रेरणेतून निर्माण झालेले संतांचे काव्यपंडित काव्य, बोधपर आख्यानकाव्य व स्फुटकाव्य इहवादी प्रेरणेतून स्फुरलेले शाहिरी काव्य ही प्राचीन मराठी कविता आहे.

२) मराठी कवितेला आधुनिक हे विशेषण प्रामुख्याने काल सापेक्षत्वाने वापरले जात असले तरी त्या कवितेमध्ये आधुनिकतेचे प्रवृत्तीरूप गुणधर्म निश्चितपणे आहेत.

३) वाङमयाचा केवळ पद्यमय भाग म्हणजेच केवळ काव्य नव्हे तर कथा कादंबरी नाटक कविता या संपूर्ण गद्य आणि पद्य लेखनप्रकारांना उद्देशून काव्य ही संज्ञा उपयोजिली जात होती.

४) काव्याला अनेक रूपकही देण्यात आलेत. ध्वनी हा काव्याचा आत्मा आहे. अतिशयोक्ती ही काव्याचे जीवित आहे. 'शब्दार्थ' हे काव्य शरीर आहेत व संस्कृत साहित्यात काव्य शब्द अत्यंत व्यापक अर्थाने योजण्यात येतात.

५) १९२० ते १९५० या कालखंडात मध्यमवर्गीय संसारचित्रे स्त्री पुरूष नाते याबरोबरच भावजीवनाची सोज्वळ अभिव्यक्तीही स्त्रीकाव्यात उमटल्याचे आढळून येते.

## संदर्भ ग्रंथ–

१) डॉ. यशवंत मनोहर– नवे साहित्य शास्त्र विजय प्रकाशन– नागपूर, पृष्ठ क्र.– १

२) त्रैमासिक– सक्षम समीक्षा– जाने., फेब्रु.–मार्च २०१४ पृष्ठ– ७७

३) प्रा. रा.ग. जाधव आधुनिक मराठी कवयित्रीच्या कविता, प्रतिमा प्रकाशन, पुणे प्रथम आवृत्ती १९६६ पृष्ठ– १०–११